INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

January 2023 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-311, January 2023

## MULTIDISCIPLINARY ISSUE



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's M.S.G. Arts, Science & Commerce College,
Malegaon (Camp), Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

January 2023 E-ISSN – 2348-7143

## International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

## Peer Reviewed, Referred & Indexed Journal

## Issue-311, January 2023

# Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's M.S.G. Arts, Science & Commerce College,**
**Malegaon (Camp), Dist – Nashik [M.S.] India.**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo :** Republic Day Parade 2023, at Kartavya Path in Delhi, India.

© **All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 1000/-**

**Published by –**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# INDEX



| No. | Title of the Paper / Author's Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Chemically Deposition of Binary Oxide $In_2O_3$: $MoO_3$ Thin Films and Study of Electrical, Structural and Gas Sensing Properties **S. V. Dhanwate, R. S. Gosavi, N. B. Kothawade** | 05 |
| 2 | Effect of the Mycorrhizal Fungus Glomus on the Survival and Growth of Drought-Stressed Pea Plants **S. W. Patale** | 12 |
| 3 | Chemical Synthesis and Physical Properties of Binary Oxide $In_2O_3$: $MoO_3$ Thin Films and Their Uses in Gas Sensing Applications **S. V. Dhanwate, R. S. Gosavi, N. B. Kothawade** | 18 |
| 4 | Apprehension of the Ontological Categories in the Jaina Philosophy **Akash Sadanand Naik Salgaonkar** | 25 |
| 5 | Chitre, Tukaram and Translation : An Apercu **Dr. Dhiraj Chouhan** | 32 |
| 6 | Concordance between Nature and the Female Characters through the Lenses of Ecofeminism in the Work 'A River Sutra' by Geeta Mehta **Mohini Sathe, Dr. Kavery Pal** | 37 |
| 7 | Reviewing Feminism in the Works of Rabindranath Tagore **Dr. Abdul Anees Abdul Rasheed, Mrs. Kavita Kakhandki** | 44 |
| 8 | A Study of Rohinton Mistry's Fiction **Dr. B. P. Shewale** | 49 |
| 9 | The Political Exposition in Pinter's Plays **Dr Abhay Mudgal, Nitin Gaikwad** | 54 |
| 10 | A Study of Chhatrapati Shahu Maharaj Contribution in Social Change **Pramod Bhumbe** | 58 |
| 11 | Dr. Babasaheb Ambedkar and Social Justice under Indian Constitution **Dr. Dhananjay Wankhade** | 62 |
| 12 | Family Conflict and Wellbeing among Working and Non-Working Women **Dr. C. P. Labhane , Mr. Anil Sawale** | 67 |
| 13 | A Comparative Study of Open Book Exam & Close Book Exam **Dr Vandana Satish Chaudhari** | 71 |
| 14 | Learning Habits of Students Taking Online and Offline Education **Dr. Prakash Mangaonkar** | 75 |
| 15 | Income Inequalities in India **Dr. Jagannath Dhakane** | 79 |
| 16 | Attracting Retail Sector among the Salaried Persons : Organized or Unorganized **Dr. Mohammed Aamer** | 85 |
| 17 | Geographic Applications of GIS in Tourism Management **Dr. Kishor Nehete** | 89 |
| 18 | GIG Economy in India: Opportunities and Challenges **Dr. Sangeeta Ghate** | 92 |
| 19 | Pregnancy Experience and Maternal-Foetal Attachment of Surrogate, Intended and Expectant Mothers **Dr. Abhimanyu Dhormare** | 97 |
| 20 | New Education Policy 2020 : An Overview **Dr. Anuradha Goswami** | 106 |
| 21 | New Education Policy 2020 and Its Impact on Higher Education **Dr. Bharatchandra Shewale** | 108 |
| 22 | भारत में संसदात्मक व्यवस्था भासन की निरन्तरता : एक अवलोकन **डॉ. शिखा जैन** | 112 |
| 23 | मध्ययुगीन व स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी स्त्रियांचे साहित्यविषयक योगदान **डॉ. राष्ट्रपाल मेश्राम** | 118 |
| 24 | हॅलोवीन : उगम आणि विकास **डॉ. अंजली मस्करेन्हस** | 126 |

E-ISSN : 2348-7143
January 2023


| | | | |
|---|---|---|---|
| 25 | भारतीय सर्कशीचे जनक : विष्णुपंत छत्रे | **डॉ. दत्तात्रय डुबल** | 132 |
| 26 | भारतीय सिनेमा आणि राष्ट्रीय भावना | **डॉ. संभाजी जाधव** | 138 |
| 27 | वि.का.राजवाडेंचे मराठी भाषा, साहित्य व संशोधन क्षेत्रातील योगदान | **राजीव आरके** | 141 |
| 28 | स्वा. सावरकरांची देशभक्तीपर कविता - एक आकलन | **डॉ. धनराज धनगर** | 146 |
| 29 | मध्ययुगीन रोहिणखेड | **डॉ. दिपक किनगे** | 151 |
| 30 | छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषयक धोरण | **डॉ. नारायण गाढे** | 154 |
| 31 | शिवधर्म चळवळ आणि जातीव्यवस्था | **डॉ. राजकुमार बिरादार** | 159 |
| 32 | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले : स्त्री हक्काच्या प्रणेत्या | **प्रा. आर. के. सूर्यवंशी** | 166 |
| 33 | महात्मा गांधींचा सर्वधर्मसमभाव | **डॉ. दत्ताहरी होनराव** | 169 |
| 34 | विवेकानंद यांचे स्त्री विचार | **प्रा. दर्शन रानवळकर** | 174 |
| 35 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक प्रबोधनपर विचार | **डॉ. सदाशिव शिंदे** | 177 |
| 36 | लहुजी साळवे यांचे क्रांतिकारी कार्य एक : चिकित्सक अभ्यास | **डॉ. लता आंदे** | 182 |
| 37 | वर्तमान ग्रामीण साहित्यातील स्त्रीचे बदलते रूप : एक दृष्टिक्षेप | **डॉ. विजय केसकर** | 188 |
| 38 | प्रकाश कामतीकरांच्या ललित लेखनातील काव्यमयता | **डॉ.राजाभाऊ धायगुडे** | 193 |
| 39 | शेत - शिवाराशी हितगुज साधणारा कवितासंग्रह : 'शिवार' | **डॉ. संजय शिंदे** | 196 |
| 40 | युद्धशाळा : दलित कवितेतील नवे प्रकाशपर्व | **डॉ. राष्ट्रपाल मेश्राम** | 201 |
| 41 | मराठी शैली वैज्ञानिक अभ्यास | **पायल जगताप** | 213 |
| 42 | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महिलांचे योगदान | **डॉ. संजय पाटील, श्री गणेश पाटील** | 225 |
| 43 | मराठी वृत्तपत्रातील वार्तांकनाचा शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर होणारा परिणाम | **डॉ. भगवान सूर्यवंशी** | 230 |
| 44 | बचत गटातील सक्रिय महिला आणि असक्रीय महिलांच्या आशावादी निराशावादी अभिवृत्तीचा अभ्यास | **डॉ. बी.यु. पवार** | 238 |
| 45 | भारतातील उच्च शिक्षण संस्था मधील ग्रंथालयाच्या वाढ व विकासात विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका | **डॉ.पल्लवी मुंढे, हरिश्चंद्र सलगर** | 242 |
| 46 | اردو کے غیر مسلم مثنوی نگار | محمد اسمٰعیل محمد عبدالنعیم | 245 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 311: Multidisciplinary Issue
Impact Factor : 6.625
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
January 2023

# मध्ययुगीन रोहिणखेड

**डॉ. दिपक दिनकर किनगे**

सहाय्यक प्राध्यापक आणि इतिहास विभाग प्रमुख,

डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव - ४२५००१

मोबाईल क्र.- ९४२१११८२७५, इमेल आयडी- ddkinge@gmail.com

**सारांश :**

रोहिणखेड हे मध्ययुगीन इतिहासकाळातील गाव आहे. येथील मशीद ही मध्ययुगीन काळातील मुस्लिम स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. सोळाव्या शतकातील ही मशीद आजही अत्यंत सुस्थितीत आहे. रोहिणखेड हे गाव मध्ययुगात राजधानीचे ठिकाण होते, तसेच या ठिकाणी दोन वेळा लढाया झालेल्या आहेत. रोहिणखेड गावाविषयी ऐतिहासिक माहिती मिळविणे हा प्रस्तूत शोध निबंधाचा हेतू आहे.

**महत्वाचे शब्द :**

रोहिणखेड, नळगंगा, अजिंठा, नाशिरखान, मशीद, खुदावंदखाा महदवी, निजामशाही, शहजादा बुराण, अलावुद्दीा बहमाी.

रोहिणखेड हे एक प्राचीन व ऐतिहासिक खेडे आहे. मलकापूर ते बुलढाणा या राजमार्गावरुन धामणगाव कडे जाणारा एक फाटा फुटतो. तेथूा सहा मैल अंतरावर रोहिणखेड गाव वसलेले आहे. गावाच्या एका बाजूला ाळगंगाादी आणि दुसऱ्या बाजूला ाळगंगेची एक उपादी आहे. गावाच्या दक्षिणेस अजिंठ्याचा डोंगर आहे. अजिंठा डोंगरावर चढ़ा जाण्यासाठी पुर्वीपासून एकक्ररस्ता रोहिणखेडवरु जात होता. तो रस्ता आजही `रोहिणखेडचा घाट` या नावाने ओळखला जातो. [1]

रोहिणखेड हे गाव बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यात आहे. रोहिणखेड बुलडाण्यापासूा पश्चिम दिशेस 25 किलो मीटर अंतरावर आहे. या गावात आज रोजी सुमारे 15000 लोक राहतात.[2] अशी माहिती गावातील शिक्षक श्री. राजेंद्र मोरे यांनी दिली.

अजिंठा पर्वतरांगाच्या निसर्गरम्य कुशीत वसलेले पंधराव्या शतकातील रौनकाबाद नंतर रोहिणाबाद आणि आत्ताचे रोहिणखेड हे गाव पुरातन भारतीय संस्कृतीच्या ऐतिहासिक वैभवाचे साक्षीदार आहे. कलात्मक पातळीवर सुंदररचना असलेल्या वास्तू या वैभवात आणखी भर घालतात. निजामशाहीत कधी काळी राजधानीचे शहर म्हणून ओळखल्या गेलेले रोहिणखेड आता तेथिल मशिदीमुळे पुन्हा प्रकाशझोतात आले आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात बाबासाहेब पुरंदरेंनी भाषणात बुलढाणा जिल्ह्यातील या वास्तूचा (मशीद) नामोल्लेख केला होता. [3] यावरुन निजामशाही काळात रोहिणखेड गावाला व तेथील मशिदीला असलेले महत्व स्पष्ट होते.

रोहिणखेड गावात प्राचीा मंदिरे व मशिदी आहेत. रोहिणखेड येथे स्थापत्य कलेचे विलोभनीय उदाहरण असलेली मशिद आहे. रोहिणखेड गावात प्रवेश करण्यापुर्वी नदीच्या अलीकडील काठावर, रस्त्याच्या डाव्या बाजूला ती उभी आहे. मशीद लहाा पण टुमदार आहे. खुदावंदखाा महदवी याो ती इ. स. 1582 मध्ये बांधली. या मशिदीतील एक विशेष असा की, तिच्या भिंतीच्या आतील बाजूवरील ओककदगडावर फारशी भाषेत काही मजकूर लिहीलेला आहे. कोरड्या दगडावरील हा मजकूर एरवी दिसत ाही, पण त्या दगडावर पाणी शिंपले म्हणजे तो स्पष्ट दिसतो. अनेक प्रवाशी ही मौज पाहण्यासाठी येथे येतात. ओल्या फडक्याो हे लेख इतक्यांदा घासले गेले तरी ते अजूा जसेच्या तसे आहे. [4] वरील विवेचनावरुन मध्ययुगीन स्थापत्यकला व शिल्पकला याविषयी माहिती मिळते.

रोहिणखेडसोबतच साखरखेर्डा आणि पाल येथेही सारख्याच ढाच्यातील या वास्तू आहेत. मात्र रोहिणखेडमधिल वास्तूचे वैशिष्ट वेगळे आहे. येथील भिंतीवर केलेल्या कोरीव कामामध्ये कुराणातील आयत लिहिण्यात आलेले आहेत. पाण्याने कापड ओला करुन या भिंतीवर फिरवल्यानंतरच ते कोरीव काम वाचता येते. ओलावा संपला की पुन्हा अक्षर नजरे आड जातात. शिशे वितळवून या कामात वापर झाल्याचे जाणकार सांगतात. अरबी भाषेतील ही कला कुसर आहे. लाल व काळी शाई यासाठी वापरण्यात आली आहे. असे गजानन धांडे यांनी दैनिक महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रातील लेखात म्हटले आहे.[5] त्यांच्या या माहितीस डॉ. वि. भी. कोलते लिखित प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर या ग्रंथातून पुष्ठी मिळते.

आजही दर शुक्रवारी विशेष नमाज पठन या ठिकाणी केल्या जाते. या मशीदीचे बांधकाम संपूर्ण दगडामध्ये झ ााले असून, कला कृतीचा उत्तम नमुना ही मशीद आहे. त्यामुळे या मशीदीला ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले आहे. रोहिणाबाद गावात या मशीदीसह अनेक ठिकाणी पुरातन वास्तुंचा ठेवा आहे......... निजामशाहीतील रोहिणखेड हे राजधानीचे शहर व्यापारासाठी प्रसिध्द असल्याने सुखी व समृध्द होते. असे मुरलीधर चव्हाण म्हणतात.[6]

इ.स. 1437 आणि इ.स. 1582 मध्ये येथे दोा मोठ्या लढाया झाल्या. आपल्या मुलीला वाईट रितीा वागविल्याबद्दल खाादेशचा सुलताा ाशिरखाा याो आपला जावई अलावुद्दीा बहमीावर स्वारी केली तेव्हा 1437 साली जी लढाई झाली ती रोहिणखेड येथे. इ.स. 1582 मध्ये अहमदागरचा शहजादा बुराण याो अहमदागरच्या राज्यावरील आपला हक्कक्प्रस्थापित करण्यासाठी आपला मुलगा इसमाईल याच्या विरुध्द वऱ्हाडवर स्वारी केली. त्या वेळी दोघांच्याही सैयाची गाठ पडाू लढाई झाली तीही रोहिणखेड येथेच. या दोही प्रसंगी रोहिणखेड उध्वस्त झाले असणे स्वाभाविक आहे. बहुधा याच वेळी तेथील श्रीमंताी आपली संपत्ती जमिीत पुरा ठेवली असावी. आज ओकक ठिकाणी खोदले असता मुसलमानकालिा सोयाची ााणी सापडतात ती त्याचमुळे. काही वर्षांपूर्वी ाळगंगा ादीवरील पूल बांधण्यासाठी खोदकाम चालले असताा सोयाच्या ाण्यांाी भरलेली ओक पोती ठेकेदाराला सापडली.[7]

गावात 12 मारुती मंदिरे, 12 महादेव मंदिरे, 12 मशिदी आणि 12 वेशी आहेत. गावतील कोळेश्वराचे मंदिर आणि संत गजानन बाबाचे मंदिर प्रसिध्द आहे. तसेच गावात दर आठवड्यातून एकदा समर्थ रामदास स्वामींची बैठक होते. गावाच्या संरक्षणासाठी मध्ययुगीन काळात संरक्षण भिंत बांधण्यात आली होती. तीचे अवशेष आजही काही प्रमाणात आढळतात. गावात मध्यवर्ती ठिकाणी एक पुरातन गढी आहे. तीचे बांधकाम इ.स. 1805 साली झाले आहे. या गढीची उंची 20 ते 22 फुट असून तीचा आकार वर्तुळाकार आहे. भुपृष्टापासून वरच्या दिशेने गढीचा आकार निमुळता होत गेलेला आहे. या गढीमध्ये पुर्वी लोकांनी सोने चांदी पुरुन ठेवल्याचे आढळून आले आहे. अशी माहिती गावातील रहिवासी श्री. लक्ष्मण शेळके यांनी दिली आहे.[8]

औरंगजेबाच्या शासनकाळात दिल्लीश्वरांना औरंगाबादला जाण्यासाठी पालमार्गे बुऱ्हानपूर, मलकापूर, रोहिणखेड, देऊळघाट तेथून पुढे औरंगाबादला पोहचता येत होते. घाट दरवाजासारखी वास्तू आजही नवाबवंशज राहत असलेल्या देऊळघाट परिसरात असून रोहिणखेड येथील बुरजावरुन ती पाहता येते. सैनिकांना पुर्व सुचना देण्यासाठी व निगराणीसाठी या वास्तूंचा उपयोग केला जात होता.[9] रोहिणखेड हे मुघलकाळात प्रशासकीय व लष्कर स्थानिक केंद्र असावे.

**निष्कर्ष**:-

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी सत्काराला उत्तर देतांना महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे जपण्याचे आवाहन सरकारला केले. यासाठी त्यांनी उदाहरणादाखल मोताळा तालूक्यातील रोहिणखेडच्या प्रख्यात मशिदीचा उल्लेख केला.[10] त्यावरुन रोहिणखेडच्या मशिदीचे ऐतिहासिक महत्व स्पष्ट होते. ही मशीद सध्या पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे. हे गाव मध्ययुगीन काळात दिल्ली ते औरंगाबाद मार्गावरील एक महत्वाचे मोक्याचे ठिकाण होते. रोहिणखेड गावात हिंदू-मुसलमान धर्माशी संबंधित अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत. ह्या वास्तूंमुळे रोहिणखेड गावात ऐतिहासिक स्थापत्य कलेचा आणि शिल्पकलेचा वारसा जतन करण्याचे काम केले आहे. इ.स.

E-ISSN : 2348-7143
January 2023

1437 आणि इ.स. 1582 मध्ये झालेल्या लढायांमध्ये रोहिणखेड उध्वस्त झाले असले तरी या गावाने आपले ऐतिहासिक, व धार्मिक महत्व टिकवून ठेवले आहे. याचे सर्व श्रेय हे रोहिणखेडच्या गावकऱ्यांचे आहे.

**संदर्भ:-**

1. कोलते, वि. भि., ***प्राचीन विदर्भ आणि आजचे नागपूर***, अमरावती विद्यापीठ, अमरावती, 10 सप्टेंबर, 1995, पृ. 65
2. प्रत्यक्ष गाव भेट, दि. 18 सप्टेंबर2020
3. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, 02 सप्टेंबर 2015
4. कोलते, उपरोक्त
5. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, 02 सप्टेंबर 2015
6. दैनिक लोकमत, 21 ऑगस्ट 2015
7. कोलते, उपरोक्त, पृ. 66
8. प्रत्यक्ष गाव भेट, दि. 21 ऑगस्ट 2020
9. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, 02 सप्टेंबर 2015
10. दैनिक लोकमत, 21 ऑगस्ट 2015